**मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर.**

जा.क्र.मनपा/प्राशिमं/आस्था-२/ १२४ /२०१८-१९
मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर.
दि.२३/०८/२०१८

-: जाहिरात :-

**WALK - IN- INTERVIEW**

दि.०१/०८/२०१८, वेळ दुपारी -३.३०वाजता

**स्थळ :- महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, नवी पेठ, सोलापूर.**

सोलापूर महानगरपालिकेच्या मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर अंतर्गत असलेल्या इंग्रजी माध्यम मनपा सावित्रीबाई फुले इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळेत तात्पुरत्या स्वरुपात अकरा महिन्याच्या कालावधी करीता खालील शैक्षणिक पात्रताधारण करणा-या पात्र उमेदवारांकडून Walk - in-Interview व्दारे करार पध्दतीने शर्ती व अटीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | एकवट वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटी शिक्षक | ५ (पाच) | H.S.C.Ded in English Medium | एकवट मानधन दरमहा रुपये ८,०००/- यावर अकरा महिन्याच्या कालावधी करिता दर महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देऊन, नियुक्ती राहील. अकरामहिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप संपुष्टात होईल. |
| २ | कंत्राटी शिक्षक | १ (एक) | B.Sc. B.Ed in English Medium | |

सदरच्या जाहिरातीबाबत अधिक माहिती व शर्ती / अटी सो.म.पा.च्या या www.solapurcorporation.gov.in व www.solapurcorporation.org या संकेत स्थळावरही प्रसिध्द करणेत आलेली आहे.

**कार्यालयीन वेळेत दि. १ /०८/२०१८ पर्यंत मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ, नवी पेठ, सोलापूर येथे अर्ज सादर करावे.**
(दुपारी ३.००)

**प्रशासनाधिकारी**
**मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर**

**आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

# मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर.

शर्ती व अटी :-

१) वयोमर्यादा :- दि.०१/०७/२०१८ रोजी ३३ वर्षापेक्षा जास्त असू नये व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त असू नये. उच्च व जादा शैक्षणिक पात्रता धारण करणा-या उमेदवारांसाठी वयाची अट शिथिल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांचे कडे राहील.

२) मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही - २०१०/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.१ जुलै २००५ नुसार लहान कुटुंबांची अट लागू असुन त्यानुसार दि.२८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवारांने सादर करावयाचे आहे.

३) आपली नियुक्ती ही दरमहा एकवट र.रु.८०००/- मानधनावर असुन पुर्णवेळ काम करण्याच्या अटीवर राहिल. अकरा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल यांची नोंद घ्यावी.

४) संबंधीत उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करुन घेण्यात येईल.

५) इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांच्या संपूर्ण परिचयपत्र, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या (इ.१०वी, १२वी, बी.एड, डी.एड, पदवी, पदवीत्तर गुणपत्रक प्रमाणपत्रांची प्रत, अनुभव दाखला, जातीचा दाखला व लहान कुटुंबाचा दाखला इत्यादी) साक्षांकित प्रती, पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह वरील तारखेस दिलेल्या वेळेत उपस्थित रहावे.

६) उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे.

७) स्थानिक परिस्थितीनुसार शर्ती व अटी बाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील सदर व इतर शर्ती व अटी सो.म.पा.च्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिले आहे.

८) कोणतेही कारण न देता निवड प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे/रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.

९) नियुक्तीसाठी कसल्याही प्रकारचा दबाव/गैरमार्गाचा अवलंब केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्यावर कसलीही कल्पना न देता रद्द करण्यात येईल व त्याबद्दल कसलीही तक्रार करता येणार नाही.

१०) सदरची नियुक्ती ही केवळ ठराविक कालावधी करीता व नमूद एकवट मानधनावर करार पध्दतीने असल्याने नियुक्ती पुर्वी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करार पत्र करुन दयावे लागेल.

११) सदरचे पदावर करार तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती असल्याने, भविष्यात मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ / मनपाकडे सदर पदावर हक्क सांगता येणार नाही, व नोकरीत कायम करण्याबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

१२) नियमित शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे अन्य कोणतेही लाभ, वेतनश्रेणी, रजा, पेन्शन इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

१३) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियुक्तीपत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.

१४) आपण जर अन्य ठिकाणी नोकरीस असेल तर त्या संस्थेचा/कार्यालयाचा राजीनामा स्विकृत केल्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक आहे.

१५) सदरचे नियुक्ती पत्र मिळालेपासून सात दिवसांचे आत कामावर रुजू व्हावे लागणार आहे. सदरचे नियुक्तीपत्र मिळूनही आपण सबळ कारणामुळे हजर होऊ शकत नसाल व ती कारणे मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे समाधान करु शकत नसतील तर आपले नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल व त्यानंतर नेमणुकीबाबत आपल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१६) आपणास करारातून मुक्त व्हावयाचे असल्यास किमान ३० दिवसांची पूर्व सुचना नियुक्ती प्राधिका-यास देणे अथवा तीस दिवसाचे एकवट वेतन (पगाराची) रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे जमा करणे आवश्यक आहे.

१७) आपण सादर केलेली कागदपत्राच्या सत्यतेबाबत प्रश्न उपस्थित झाल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

१८) इच्छुक उमेदवारांनी दि.०१/०८/२०१८ रोजी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ, नवी पेठ, सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते दुपारी १.०० अर्ज सादर करावे. (सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात)

१९) आलेल्या अर्जांची छाननी करुन पात्र व अपात्र उमेदवारांची यादी दि.०१/०८/२०१८ रोजी कार्यालयात दुपारी ३.०० वाजता प्रसिध्द करण्यात येईल. पात्र उमेदवारांनीच सर्व मूळ कागदपत्रासह मुलाखतीस दुपारी ३.०० वाजता मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर, इंद्रभवन येथे उपस्थित रहावे.

२०) सदरचे जाहिरात सो.म.पा.च्या या www.solapurcorporation.gov.in व www.solapurcorporation.org या संकेत स्थळावरही प्रसिध्द करणेत आलेली आहे.

टिप:- प्रथम श्रेणीत उत्तीर्ण व अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

(सुधा साळुंके)
प्रशासनाधिकारी
मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर.

## मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर

## इंग्लिश मीडियम स्कूल कंत्राटी शिक्षक भरती

फोटो

अ. सामान्य माहिती माध्यम

१ डी.एड. [ ] २ बी.एड. [ ]

२ पदाचे नाव:---------------------------- मुलाखतीचा क्रमांक:-

ब. उमेदवारांची वैयक्तिक माहिती

१ उमेदवाराचे पूर्ण नाव:-

(आडनाव प्रथम)

२ संपूर्ण पत्ता:-

(तपशिलासह)

३ अ जन्म दिनांक अंकी

| | | |
|---|---|---|
| | | |

अक्षरी

ब उमेदवाराचे दिनांक

| | | |
|---|---|---|
| ३१ | ७ | २०१८ |

रोजीचे वय वर्षे महिने दिवस

३ लिंग:- पुरुष [ ] स्त्री [ ]

४ जात:- [ ] प्रगर्व [ ] प्रमाणपत्र आहे/नाही

५ जात वैधता प्रमाणपत्र आहे काय? आहे/नाही

६ क्रिमीलियर प्रमाणपत्र आहे काय? होय/नाही

७ शैक्षणिक अर्हता [ ]

विविध परीक्षेत उमेदवारास मिळालेले गुण

अ. एस.एस.सी.उत्तीर्ण वर्ष [ ]

| मिळालेले गुण | पैकी गुण | शेकडा गुण |
|---|---|---|
| | | |

ब. एच.एस.सी.उत्तीर्ण वर्ष [ ]

| मिळालेले गुण | पैकी गुण | शेकडा गुण |
|---|---|---|
| | | |

क. डी.एड.उत्तीर्ण वर्ष [ ]

| मिळालेले गुण | पैकी गुण | शेकडा गुण |
|---|---|---|
| | | |

ड. बी.एड.उत्तीर्ण वर्ष [ ]

| मिळालेले गुण | पैकी गुण | शेकडा गुण |
|---|---|---|
| | | |

८ उमेदवार महाराष्ट्राबाहेरील असल्यास रहिवासी प्रमाणपत्र आहे काय? होय/नाही.

९ खेळाडू असल्यास प्रमाणपत्र आहे काय? होय/नाही खेळाचा प्रकार [ ]

१० उमेदवार विवाहीत आहे/नाही.

११ विवाहीत असल्यास, लहान कुटुंबाचा दाखला आहे/नाही.

उमेदवाराची स्वाक्षरी

नाव:-